# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

**दिनांक १६/०६/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

## डायल ११२ प्रकल्प नागपूर ग्रामीण हे राज्यात सलग दुसऱ्यांदा प्रथम

आपातकालीन परिस्थीतीत नागरिकांना त्वरीत पोलीस मदत मिळावी याकरीता महाराष्ट्र राज्य पोलीस दलात २७ सप्टेंबर २०२१ पासुन 'डायल ११२' हा उपक्रम सुरू केलेला असुन, या उपक्रमाच्या अनुषंगाने नागपूर ग्रामीण जिल्हयात पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर यांचे मार्गदर्शनात हा उपक्रम राबिण्यात येत आहे.

अडचणीत असलेल्या पिडीत व्यक्तीना विशेषत: महिलांना तातडीने पोलीसांची मदत मिळावी या हेतुने राज्य शासनाने पोलीस दलामध्ये सुरू केलेल्या **'डायल ११२' प्रकल्पामध्ये माहे एप्रिल/२०२२ मध्ये जिल्हा नागपूर ग्रामीण घटकाला ९२३ पिडीत व्यक्तींचे कॉल उपलब्ध झाले असुन कार्यक्षेत्र हे ग्रामीण भागातील असुन सुध्दा कमीत कमी वेळेत 'डायल ११२' च्या वाहनांनी त्यांना वेळीच मदत पोहचविली आहे. या संपुर्ण कॉल चा सरासरी वेळ हा ९.०० मिनिट असा असुन कमी वेळेत पिडीतांना मदत पोहचविल्याबाबत घटकाचा महाराष्ट्र राज्यामध्ये प्रथम क्रमांक आला आहे. तसेच माहे मे/२०२२ मध्ये घटकाला १०७६ पिडीत व्यक्तींचे कॉल उपलब्ध झाले असुन पिडीतांना वेळीच मदत पोहचविली असुन संपुर्ण कॉलचा सरासरी वेळ हा ७.५८ मिनिट असा असुन कमी वेळेत पिडीतांना मदत पोहचविल्याबाबत महाराष्ट्र राज्यामध्ये सलग दुसऱ्यांदा नागपूर ग्रामीण पोलीस दलाचा प्रथम क्रमांक आला आहे.** ग्रामीण भागात सर्वत्र 'डायल ११२' च्या मदती बाबत च्या चर्चा असुन पोलीसांच्या कामगिरी बाबत जनमाणसात कौतुक होत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर यांनी घेतलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे झालेली आहे. सलग दोन महिने राज्यात प्रथम क्रमांक आल्याने मा. पोलीस अधीक्षक साहेब यांनी 'डायल ११२' काम करणाऱ्या अधिकारी १) सपोनि श्री. प्रशांत लभाने, २) पोउपनि श्री. संदीप सडमेक व पोलीस अंमलदार ऑपरेटर असे २५ अधिकारी/कर्मचारी यांचा गुन्हे बैठकीदरम्यान प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देवुन सन्मान केलेला आहे. तसेच यापुढेही राज्यात सर्वप्रथम राहण्याचा मानस मा. पोलीस अधीक्षक यांनी व्यक्त केला आहे.

**राज्यातील विविध जिल्हयांचा उत्तम प्रतिसाद वेळ**

| अनु.क्र. | माहे एप्रिल/२०२२ | प्रतिसाद वेळ | माहे मे /२०२२ | प्रतिसाद वेळ |
|---|---|---|---|---|
| **१** | **नागपूर ग्रामीण** | **९.००** | **नागपूर ग्रामीण** | **७.५८** |
| २ | औरंगाबाद शहर | ९.११ | रायगड | ९.५५ |
| ३ | मिरा भायंदर | ९.४१ | सिंधुदुर्ग | १०.०४ |
| ४ | नवी मुंबई | ९.५८ | औरगाबाद शहर | १०.१३ |
| ५ | ठाणे ग्रामीण | १०.३१ | मिरा भायंदर | १०.१७ |
| ६ | नाशिक शहर | ११.३७ | चंद्रपुर | १०.४१ |
| ७ | भंडारा | ११.५५ | वाशिम | १०.४३ |

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर